ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# सरकारी कंपन्याच्या खाजगीकरणाचा परिणाम

**डॉ. सुधीर सुरेश ढोरे**
*सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग*
*स. प. महाविद्यालय, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे*

**प्रस्तावनाः—**

1980 च्या दशकात भारतात निर्माण झालेले राजकोषीय संकट अनियांत्रित व्यवहारतोलाचा प्रश्न, चलन वाढीचा उच्च दर आणि संरचनात्मक दोष यामुळे भारतीय अर्थव्यवस्था पूर्णपणे संकटात सापडल्याने यातून बाहेर पडण्यासाठी व भारतीय अर्थव्यवस्था सुधारणेसाठी अनेक धोरणात्मक निर्णय तात्कालीन सरकारने घेतले. यालाच पुढे 'आर्थिक सुधारणा' असे संबोधले गेले व यातुनच 1991चे आर्थिक धोरण जाहीर केले. या धोरणाचा प्रमुख गाभा म्हणजे उदारीकरण—खाजगीकरण— जागतिकीकरण होय. यालाच पुढे सुधारणांची त्रिसूत्री म्हणजेच 'खाऊजा' असे म्हटले गेले. स्वांतत्र्यानंतर भारत देशाचा जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाढी व सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाढी तात्कालीन सरकारने त्याकाळी सार्वजनिक क्षेत्राला अधिक महत्व दिले होते. परंतू यामध्ये मात्र या क्षेत्रातील सर्वच उदयोगांची कामगिरी ही अतिषय निराशाजनक झाली होती. त्यामुळे या क्षेत्रांचा विकास करावयाचा असेल तर विशेष उपाययोजना करणे आव" यक वाटु लागल्याने या क्षेत्राचे खाजगीकरण करणे योग्य वाटल्याने खाजगीकरण ही संकल्पना खऱ्या अर्थाने येणाऱ्या काळात रूढ झाली.

**खाजगीकरण संकल्पना** :

खाजगीकरण ही एक व्यापक संकल्पना आहे. परंतु जर आपण संकुचित अर्थाने पाहिले तर आपणांस केवळ सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांची मालकी अंशतः किंवा पूर्णतः खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरित करणे असा होतो. परंतु व्यापक अर्थाने पाहिल्यास खाजगीकरणामुळे व बाजारयंत्रणेत सरकारचा हस्तक्षेप कमी करण्यापासून ते सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांची पूर्णपणे मालकी खाजगी क्षेत्रास विकून टाकण्यापर्यंतची विविध प्रक्रिया म्हणजे खाजगीकरण होय.

**अर्थ** :

खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रामधील उदयोगांकरिता राखून ठेवलेले क्षेत्र खाजगी क्षेत्रातील उदयोगांना खुले करणे या प्रक्रियेलाच खाजगीकरण म्हणतात. थोडक्यात सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या मालकीत खाजगी व्यक्तींना सहभागी करून घेणे होय.

**व्याख्या** :

1) डी. आर. पेंडसेः "खाजगीकरण म्हणजे राष्ट्रीय आर्थिक व्यवहारातील सरकारचा सहभाग कमी करणे होय."

2) पीटर ड्रकरः शासकीय खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उदयोगांतील भांडवल काढून घेण्याची प्रक्रिया होय.

**खाजगी करणाची कारणे** :

1. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांची कार्यक्षमता ही कमी होत होती.
2. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचा संचित तोटा दरवर्षी वाढत होता.
3. सार्वजनिक उपक्रमांचा क्षमतेनुसार पुरेपुर वापर होत नव्हता.
4. अकुशल कर्मचाऱ्यांची निवड
5. राजकीय हस्तक्षेप प्रचंड प्रमाणात वाढ

**खाजगीकरण केलेल्या भारतीय कंपन्या** :

मागील काही वर्षापासून सतत प्रसार माध्यमांवर वेगवेगल्या सरकारी कंपन्यांचे खाजगीकरण करीत असल्याच्या बातम्या सगळीकडे बघावयाला मिळतात. मग या सरकारी कंपन्याचे काही असे महत्त्वाचे कारण आहे की सरकार यांचे खाजगीकरण करीत आहे. याचे मुख्य कारण असे दिसून येते की, या सरकारी कंपन्या आता सरकारला संभाळणे अवघड आहे व ते तोट्याचेही आहे. पुर्वी टेलीकॉम क्षेत्रात BSNL आणि MTNL यांच्या जोडीला VSNL कंपन्या होत्या. परंतू सरकारी कंपन्याचा या क्षेत्रात ठेवणे आणि वाढत्या मागणीला हे पुरवठा होणे शक्य नव्हते व सरकारी कर्मचाऱ्यांची अनास्था यामुळे नवीन तंत्रज्ञान आणण्याचा कंपन्याना प्रवेश देणे याशिवाय सरकारकडे पर्याय नाही. मग यात रिलायन्स कंपनी आली आणि फक्त 500 रुपयात फोन आणि स्वस्तात कॉल देऊन सर्वच परदेशी कंपन्याला यांनी झोपवले. पण तरीही मोठया नेटवर्क आणि सरकारी पाठबळ यामुळे BSNL तग धरून आहे. पण तिची सद्यास्थिती, कर्मचाऱ्यांची काम करण्याची गती आपणास ठाऊक आहे. म्हणून सरकार बँकिंग, उदयोग, पेट्रोल, टेलीकॉम, BHEL इ. कंपन्याचे मोठया प्रमाणात खाजगीकरण करण्यास सुरुवात केली आहे. याचे खुप मोठे दुरोगामी, चांगले व वाईट दोन्हीही परिणाम आपणास पहावयास मिळतील यात काय भांका नाही. फक्त हे करित आसताना सार्वजनिक — खाजगी भागीदारी यांचे संतुलन मात्र आवश्यक आहे.

**खाजगी करणाचे उद्देश** :—

**1)कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढवणे**:— सार्वजनिक क्षेत्रामध्ये कोणा एका व्यक्तीची मालकी नसल्याने या उपक्रमांतील कार्यक्षमता आणि उत्पादकता ही अतिशय कमी असते. परिणामी खाजगी क्षेत्र मात्र याबाबत अधिक कार्यक्षम आहे. कारण खाजगी क्षेत्रात जास्तीत जास्त नफा कसा मिळेल हा उद्देश डोळयांसमोर ठेवूनच वेगवेगळे निर्णय घेतले जातात. हे निर्णय नेहमीच कामाची कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढवणारी असते. कारण खाजगी क्षेत्रातील व्यवस्थापनाची यंत्रणा ही अतिशय चांगली असते. त्यामुळे कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे हा सर्वात पहिला उद्देश होता.

**2) कार्यक्षम व्यवस्थापन मंडळ** :– सार्वजनिक उद्योग हे सरकारच्या मालकीचे असल्याने यावर सरकारला फार मोठा प्रभाव पडत आहे. सरकारी हस्तक्षेप, गैरव्यवहार, सत्तेचा गैरवापर, दबाव तंत्राचा वापर करून फायदेशीर निर्णय घेणे असे वेगवेगळे तंत्र अवलंबल्याने ही व्यवस्थापकाची घडी दोषपूर्ण असत असे त्यामुळे व्यावसायासाठी आवश्यक कायदा व निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात नसते. परंतु खाजगी व्यवस्थापन मंडळ मात्र कायदेशीरपणे काम करून व्यवस्थापकाची कार्यक्षमता अधिक बळकट करते.

**3) सार्वजनिक उद्योग नफ्यात आणणे** :– भारतातील सार्वजनिक उपक्रम हे अकार्यक्षमता, सदोष व्यवस्थापन, भष्ट्राचार, अतिरिक्त हस्तक्षेप व स्पर्धेचा अभाव या प्रमुख कारणांमुळे वर्षानुवर्षे तोट्यातच असल्याने हे उपक्रम या संचित तोट्यातून बाहेर काढण्यासाठी या उपक्रमांचे खाजगीकरण आवश्यक वाटल्याने हे काळानुरुप होत गेले.

**4) अनावश्यक नियंत्रणापासुन सुटका** :– सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांवर राजकीय अनावश्यक नियंत्रण फार मोठे असायचे. त्यामुळे खाजगीकरणामुळे हे सर्व उपक्रम त्यांच्यावर असलेल्या अनाव" यक नियंत्रणापासुन मुक्त होतील आणि मोकळा श्वास येवून नव्याने कार्यरत होतील.

**5) राजकीय हस्तक्षेप कमी करणे** :– सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये मोठया प्रमाणावर त्या त्या तात्कालीन सरकारचा हस्तक्षेप फार मोठा असत. प्रत्येक राजकीय सत्ता आपल्याला जास्त फायदा कसा होईल हे विचारात घेऊन धोरणे आखत. परिणामी मोठया प्रमाणावर या सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांवर राजकीय हस्तक्षेपाचा मोठा परिणाम होऊन उत्पादनाला व नफा कमी होऊन तोटा वाढत जातो. परंतु याविरुध्द खाजगीकरण केल्याने व्यवस्थापन मंडळ योग्य तो निर्णय घेत असल्याने राजकीय हस्तक्षेपात मज्जाव होवून कार्यक्षमता वाढीस लागते.

**6) अनावश्यक कामगार कमी करणे** :– सार्वजनिक क्षेत्रावर राजकारण्यांचा प्रभाव असल्याने मोठया प्रमाणावर हितसंबंध जोपसण्यासाठी कामगार भरती केली जायची. परंतु याचा परिणाम उत्पादनावर झालेला दिसून येतो. उत्पादन वाढण्याऐवजी ते कमी झाल्याचे दिसून येते. त्यामुळे कोणतेही उद्योगांमध्ये अनुउत्पादक कर्मचारी असतील तर त्याचा भार त्या कंपनीला परवडणारा नसतो. कामगार काम करत नाहीत, अकुशल आहेत त्या सर्वांवर खाजगीकरणामुळे चाप बसला व अनाव" यक कर्मचाऱ्यांची संख्या कमी झाली.

**7) निर्णय प्रक्रिया** :– सार्वजनिक उद्योग हे सरकारच्या मालकीचे असल्याने त्या उद्योगामध्ये निर्णय घेताना खूप कालावधी फार वेळखाऊ प्रक्रिया असते. त्यामुळे योग्यवेळी योग्य निर्णय न घेतल्याने सार्वजनिक उद्योग मोठया प्रमाणावर तोटयात गेल्याचे दिसून येते. या उलट खाजगीकरणामध्ये व्यपस्थापन मंडळ कार्य करीत असते. व्यवस्थापन मंडळाने एखादा निर्णय घेतला की तो सर्वानुमते मान्य होवून त्वरीत अंमलबजावणी सुरू होते. त्यामुळे समस्या वेळेतच सोडविल्या जातात. त्याचा परिणाम उत्पादनावर होवून नफ्याचे प्रमाण वाढते.

**खाजगीकरणाचे प्रमुख फायदे** :–

1. खाजगीकरणामुळे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना आपल्या क्षमतेची खरी ओळख होईल.
2. खाजगीकरण केल्यामुळे सरकारी मालकीचे उपक्रम खऱ्या अर्थाने सार्वजनिक मालकीचे बनतील.
3. सार्वजनिक उपक्रमाचे खाजगीकरण केल्यामुळे सरकारी खर्च कमी होईल. त्यामुळे ते उद्योग चालविण्यासाठी घेतले जाणाऱ्या कर्जाचे प्रमाण कमी होईल.
4. खाजगी क्षेत्राला संधी मिळाल्याने त्यांना देशाच्या विकास प्रक्रियेत भरीव योगदान देण्यास संधी मिळाली.
5. खाजगी क्षेत्रामुळे वस्तू व सेवांच्या दर्जात आपोआप सुधारणा होते आणि किंमत रास्त होण्यास मदत होते.
6. खाजगीकरणामुळे सार्वजनिक क्षेत्रातील आर्थिक व व्यावसायीक भार कमी होतो. देशाची होणारी वित्तीय तुट होण्यास मदत होते.
7. खाजगी उद्योगांकडे सार्वजनिक उपक्रम दिल्याने सरकारचा भार कमी होतो व हाच पैसा सरकार सामाजिक विकास कार्यासाठी वापरू शकते व त्यातून सामाजिक विकास होण्यास मदत होईल.
8. खाजगीकरणामुळे नोकरीच्या संधी वाढतील. सबसीडी किंवा आर्थिक मदत द्यावी लागत नसल्याने तो पैसा विकास कामांकडे वळविता येईल.
9. नविन काळानुसार नवनविन तंत्रज्ञान येईल.
10. खाजगीकरणामुळे कामचुकार लोकांना चाप बसून कौशल्य असणाऱ्या लोकांनाच काम मिळेल.

**खाजगीकरणाचे परिणाम** :–

सद्यस्थिती आणि सार्वजनिक उपक्रमांची परिस्थिती पाहता या सर्व सरकारी कंपन्यांचे खाजगीकरण होणे अपरिहार्यच आहे. कारण खाजगीकरणाच्या धोरणांची अंमलबजावणी केल्यामुळे देशाच्या अर्थकारणावर परिणाम घडून आलेले आहेत. त्यामध्ये काही नकारात्मक तर काही सकारात्मक आहेत.

**1) सार्वजनिक क्षेत्रात घट** :– खाजगीकरणाला वाव दिल्याने सरकारने मोठया प्रमाणावरील सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण केले आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाचे झपाटयाने घट झाली व याविरूद्ध खाजगी क्षेत्राचा व्याप व सामर्थ्य वाढले आणि परिणामी खाजगी उपक्रमाची बाजारपेठेतील खाजगी क्षेत्राच्या हिश्यात वाढ झाली आणि सार्वजनिक क्षेत्राचे महत्व कमी झाले.

**2) विशिष्ट समूहाची मक्तेदारी** :– खाजगीकरणामुळे सरकारच्या ताब्यातील महत्त्वाचे उद्योग बाजारपेठेतील विशिष्ट समूहाच्या ताब्यात आले म्हणजे भांडवलदारांच्या हातात गेले. हे उद्योग गेल्याने सार्वजनिक उद्योगांचे बुरूज आपोआप एकामागून एक ढासळले व त्यातून खाजगी मक्तेदारी वाढू लागली.

**3) बेरोजगारीत मोठ्या प्रमाणावर वाढ** :– सरकारी कंपन्या सरकारच्या ताब्यात असताना मोठ्या प्रमाणावर आनावश्यक कर्मचारी कामावर असत. परंतु या उद्योगांचे खाजगीकरण केल्याने या क्षेत्रातील अनावश्यक

कर्मचाऱ्यांची संख्या कमी केली गेली त्यामुळे मोठ्या प्रमाणावर बेकारी वाढली यावर वेगवेगळ्याा संघटनांनी संप, मोर्चे, निषेध, रॅली काढल्या परंतु या सर्वांचा मात्र देशाच्या अर्थकारणावर परिणाम झालेला दिसून न आल्याने खाजगीकरण वाढतच गेले बेरोजगारीत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली दिसून येते.

**4) कार्यक्षमता वाढली** :— सरकारच्या ताब्यात उपक्रम असताना अनास्था असल्याने त्या उपक्रमाची कार्यक्षमता पूर्णपणे मंदावली होती. परंतु खासगीकरणामुळे व्यवस्थापन मंडळ कुशलपणे नेतृत्व करीत असल्याने या उद्योगाची कार्यक्षमता वाढीस लागली.

**5) भ्रष्टाचार कमी** :— खाजगीकरण करण्यापूर्वी सार्वजनिक उद्योगात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार माजलेला होता. सरकारचे नियंत्रण नसल्याने भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढलेले होते. परंतु, खाजगीकरणामुळे प्रशासकीय मंडळ भक्कम असल्याने भ्रष्टाचार कमी झाल्याचे दिसून येते.

**6) उत्पन्नावर परिणाम** :— निर्गुंतवणुकीचा कार्यक्रम नीट न राबवल्याने सरकारी उद्योगात सरकारला नफा न होता तोटा झाल्याचे आढळून आले. त्यामुळे खाजगीकरण केल्याने सरकारने आपली सार्वजनिक क्षेत्रातील मालकी व नियंत्रण गमावले हे जरी खरे असले तरी खासगीकरणामुळे समाजाचे उत्पन्न घटत गेल्याने नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले.

**सरांश** :—

1991 च्या औद्योगिक धोरण नंतर खऱ्या अर्थाने भारतीय अर्थव्यवस्थेत कमालीचे बदल झाल्याचे आपणास दिसून येतात. मुळात खाजगीकरण हे चांगले की वाईट हा मुद्दा वेगळा आहे. पण गोष्ट मात्र नक्की म्हणावीशी वाटते की भारतासारख्या विकसनशील देशाला मात्र खासगी करण्याची नितांत आवश्यकता आहे. कारण खाजगीकरणामुळे उद्योगधंदे वाढतात, स्पर्धा वाढते, परिणामी वेगवेगळया कल्पना प्रत्यक्षात येतात. मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळतो व ग्राहकास योग्य ती वस्तू किंवा सेवा रास्त भावात मिळते. उदा. B.S.N.L. च्या ऑफिस मध्ये गेल्यावर वरती न पाहणारे कर्मचारी आणि Airtel च्या ऑफिसमध्ये गेल्यावर पाणी देणारे कर्मचारी S.B.I. बँक आणि H.D.F.C. बँकेतील सुविधा, मेट्रो स्टेशन आणि सरकारी स्टेशन इ. पुरक खुप काही सांगून जातो. माझ्या मते ज्या क्षेत्राचा थेट प्रभाव व्यवसायावर मोठ्या प्रमाणात होतो. त्यामध्ये सरकारची भागीदारी ही नक्कीच असावी. उदा. आरोग्य, शिक्षण, विमा, गॅस, ऑइल, रेशन, पोस्ट, ट्रेन, एस.टी. या क्षेत्रात जर खाजगी कंपन्यांनी शिरकाव केला तर मग मात्र यात सर्वसामान्य माणूस नक्कीच भरडला जाणार यात कोणतीच शंका नाही. त्यामुळे महत्त्वाच्या सर्वच क्षेत्रावर सरकारचा प्रभाव व अंकुश असणे ही काळाची गरज आहे. अन्यथा एके दिवशी हा देश भांडवलदारांच्या हातात गेलेला असेल.

एकंदरीतच देशाचा सर्वांगीण विकास साध्य होण्यासाठी सार्वजनिक व खासगी उद्योग यांची योग्य प्रमाणात भागीदारी असून संतुलन राखणे खूप महत्त्वपूर्ण आहे. शेवटी कोणताही गोष्ट केली तरी फायदे आणि तोटे असतातच. फक्त सारासार विचार करुन योग्य निर्णय घतल्यास खाजगीकरण करणे गरजेचे वाटते.

**संदर्भसूची** :—

1. *रंजन कोळंबे, भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन.*
2. *एस. व्ही. ढमढेरे, भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, डायमंड प्रकाशन.*
3. *Jha. R. (1998) Modern Public Economic*
4. *R. Srivivasan, Strategic Management: The Indian Context*
5. *Cherunilam, F., Industrial Economics: Indian Perspective, Himalaya Publishing house. Mumbai*
6. *A. and A.N. Sadhu, Industrial Ecoomics Sing, Himalaya Publishing House Mumbai*
7. *Burthwal, R.R, Industrial Economics, Wiley Eastern Ltd, New Delhi*

**Website**

1. *FICCI (2020) Impact of Covid 19 – on Indian Economy March 2020*
2. *https://onlinelibrary.wiley.com/journal/14676451*
3. *https://onlinelibrary.wiley.com/loi/ 14676451*
4. *https://econpapers.repec.org/article/blajindec/*
5. *https://www.hse.ru/data/2010/10/22/1224130267/BSc4 _industrial_en.pdf*